Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052 (UIF)
Volume-4 | Issue-4 | Oct-2014 Available online at www.aygrt.isrj.org

१९९० नंतचे स्त्रीवादी मराठी कथाविश्व

एकनाथ ढोणे
रा.ब.नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर

सारांश — साहित्य हे समाजाचे अपत्य असते. साहित्याची निर्मिती जरी एखादी व्यक्ती करीत असली तरी त्या साहित्यकृतीसाठी आवश्यक असणाऱ्या घटकांची सामग्री त्याला समाजातच मिळत असते. म्हणजेच साहित्याची निर्मिती, विकास आणि वाढ ही समाजातच होत असते. साहित्य समाजातच निर्माण होते, फुलते व समाजातच गंध सुगंधीत करण्यात धन्यता मानते.

प्रस्तावना :-

अशा या साहित्याची विभागणी गद्य आणि पद्य या दोन विभागात केली जाते. परंतु पद्य वाङ्मयास प्राचीन परंपरा लाभलेली आहे. पण गद्य वाङ्मय मात्र अव्वल इंग्रजी कालखंडात विकसित झाले. अशा या साहित्यात कथा, कादंबरी नाटक, निबंध, ललित निबंध असे वाङमयप्रकार अस्तित्वात आले. परंतु अव्वल इंग्रजी काळात शिक्षणाचा प्रसार झाला, तळागाळातला समाज जागृत झाला, त्यांना 'स्व' ची जाणीव होऊ लागली. दुसऱ्यांचे साहित्य वाचण्यापेक्षा आपणच आपले साहित्य का लिहू नये ? या जाणिवेने १९६० नंतर वाङमयाचे अनेक प्रवाह निर्माण झाले. आणखी कारण म्हणजे देशाल स्वातंत्र्य मिळाले खरे प□ स्वातंत्र्यपूर्व कालखंडात देशातील लोकांनी पाहिलेल्या स्वप्नांचा चुराडा झाला होता. सर्व स्वप्ने भंग पावली होती. या सर्वांचे चित्रण या साहित्यातून येऊ लागले.

त्याचबरोबर स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध झाल्या. शिक्षणाचे लोण खेड्यापाड्यापर्यंत जाऊन पोहचले. त्यातून सर्व जनता साक्षर झाली आणि आपले दु:ख, अन्याय, अत्याचार, आपली मागासलेपणाची वेदना मांडण्यासाठी लेखक पुढे आले आणि त्यांनी साहित्याचा आधार घेतला. त्यातून नवनवीन साहित्यप्रवाह अस्तित्वात आले. त्यात ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, संज्ञाप्रवाही, मनोविश्लेषणात्मक, प्रादेशिक, महानगरीय इत्यादी साहित्य प्रवाह उदयास आले.

१९६० नंतर अनेक प्रवाह उदयास आले, त्या प्रवाहांमध्ये 'स्त्रीवादी साहित्य' हा प्रवाह महत्त्वपूर्ण ठरला. कारण स्वातंत्र्यपूर्ण कालखंडातच स्त्रियांनी साहित्यानिर्मिती करण्यास

सुरूवात केली होती. याच काळात काही आत्मचरित्रे आणि बरेचसे कथासंग्रह प्रकाशित झाले होते. परंतु हे लेखन रूढ चाकोरीतून झालेले होते. पतीला परमेश्वर मानून त्याच्या पायावर लीन होण्यात, जन्माचे सार्थक मानणाऱ्या स्त्रीने याच दृष्टीकोनातून आपले लेखन केले. १९६० नंतर मात्र या दृष्टीकोनात अमूलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. कारण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पूर्वीच्या समाजसुधारकांनी केलेल्या कार्यामुळे आता स्त्री बऱ्याच गोष्टीत स्वतंत्र्य झाली होती. ती शिकू लागली होती म्हणजेच शिक्षणाने आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराची जाणीव होऊ लागली होती आणि ती आपल्या दबलेल्या भावनांना वाचा फोडण्यासाठी मार्ग शोधू लागली होती. तेव्हा ती सुध्दा साहित्य निर्मिती करू लागली. तिने पण साहित्याचा आश्रय घेतला आणि ती त्यातून आपले मन, भावना, मानसिक आंदोलन व्यक्त करू लागली व त्यातूनच स्त्रीवादी साहित्याचा उदगम व विकास झाला.

स्त्रीवाद : व्या□या व स्वरूप :

आपल्या समाजाचे लिंगभेदावर आधारित दोन घटक आहेत. स्त्री व पुरूष 'स्त्रीवादी साहित्य' म्हणजे काय हे समजून घेताना काही संज्ञांचे अर्थ स्पष्ट व्हावे लागतात. फिमेल म्हणजे स्त्री, फेमिनिझम म्हणजे स्त्रीप्रधान, फेमिनिष्ट म्हणजे स्त्रीवादी होय. एखादी कलाकृती स्त्री-ने लिहिली म्हणून ती स्त्रीवादी ठरत नाही. उलट बहुसंख्य स्त्री लेखिका पुरूष प्रधान संस्कृतीने निर्माण केलेल्या पध्दतीप्रमाणे लिहितात.

'स्त्री' चा खास अनुभव व्यक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य असेही नाही. कारण पितृसत्ताक संस्कृतीने स्त्रियांचे अनुभव अनेकदा दडपून टाकलेले आहेत. स्त्रियांच्या मनात माणूस म्हणून जाणीव जागृत करणे आणि स्त्रीला समाजात माणूस म्हणून मिळ□, तसा विचार व कृती होणे हा स्त्रीवादी चळवळीचा मुख्य विचार असल्याने या चळवळीतून उदयास आलेले व स्त्रियांच्या खास अशा अनुभवांना अविष्कृत करणारे साहित्य म्हणजे 'स्त्रीवादी साहित्य' होय.

'स्त्रियांना दुर्बलतेतून मुक्त करणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य' डॉ. उषा तांबे.

स्त्रीवादी साहित्यात स्त्रीने जे व्यक्त केले ती एक वेदना आहे वैताग आहे. पुरूष प्रधान संस्कृती बद्दलची चीड, संताप आहे. म्हणूनच स्त्रीवादी साहित्याची अशी एक व्याख्या करता येईल.

'स्त्री म्हणजे केवळ शरीर नव्हे, उपभोगाची वस्तू नव्हे, तिला मन आहे आणि त्या मनाची इच्छा आकांक्षा, स्वाभिमान जागवणारे तसेच तिच्या स्वत्त्वाची जाणीव करून देणारे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय.'

वरील प्रकारचा स्त्रीवादी दृष्टीकोन मनात बाळगून काही स्त्रियांनी आपली साहित्य निर्मिती केली. अशा साहित्याचा समावेश स्त्रीवादी साहित्यात होतो.

१९६० नंतरची स्त्रीवादी कथा

१९७५ ते १९८५ हे दशक अमेरिकेतील स्त्रियांनी 'फेमिनाइन' म्हणून साजरे केले आणि या घटनेचाच परिणाम साऱ्या जगभर झाला. यानंतर स्त्रियांना समाजाकडे व पुरूषसत्ताक समाजव्यवस्थेकडे पाहण्याची नवी दृष्टी लाभली. ती आता स्वतःचा, स्वतःच्या अस्तित्त्वाचा व स्वातंत्र्याचा शोध घेऊ लागली. आपल्यावरील होणाऱ्या अत्याचाराचा वेध घेऊ लागली. त्यातूनच १९६० नंतरच्या स्त्रीवादी साहित्याचा उगम झाला. त्यात महत्त्वाच्या ठरल्या त्या 'स्त्रीवादी कथा'. या कथांच्या माध्यमातून वेगवेगळ्या लेखिकांनी तत्कालीन स्त्री विषयक जाणिवांची, वागणूकीची, तिच्या इच्छा, अकांक्षा याची चर्चा केली तसेच स्त्री विषयक सामाजिक समस्यांचा उहापोह केला. उदा. बालविवाह, बालविधवा, प्रौढ कुमारिका, घटस्फोटींता, स्त्रीवागणूक इ...

१९६० नंतरच्या स्त्रीवादी कथा लेखनाची आजपर्यंत अनेकदा समीक्षा झाली आहे. संशोधनेही झाली आहे. ते स्त्रीवादी, साहित्याचे सामाजिक, मानसशास्त्रीय, चिकित्सक, मार्क्सवादी, आस्वादक अशा अनेक अंगाने संशोधने करण्यात आले आहे.

असे असले तरी काळाबरोबर समाज बदलतो, समाजाबरोबर समस्या बदलतात, परिस्थिती बदलते. त्यामुळे १९६० चा 'स्त्रीवाद' आणि १९९० नंतरचा 'स्त्रीवाद' यात फरक पडलेला दिसून येतो. सामाजिक, आर्थिक, राजकिय, कौटुंबिक, नैतिक बदल झाल्याचे दिसून येते. १९६० च्या कथेतील सर्वच पुरूषांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. परंतु काळानुरूप मानवी वर्तनात बदल होऊन वरील वृत्तीने परीवर्तन होत आहे. या परीवर्तनीय वृत्तीचे चित्रण नव्वदोत्तरी स्त्रीवादी कथेत सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन परंपरेचा प्रभाव आहे. त्यामुळे १९९० नंतरची स्त्री स्त्रीवादीकथेत स्त्रीयांच्या संदर्भात येणाऱ्या समस्या, सुख-दुःख या सर्वच विषयावर मुक्तपणे संवाद साधणारी दिसते म्हणून नव्वदोत्तरी 'स्त्रीवादी साहित्य' स्त्रीसंवादी आहे असे मला वाटते.

नव्वदोत्तरी मराठी स्त्रीवादी कथा :

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी अव्याहतपणे आपआपले कार्यकर्तृत्त्व निष्ठेने बजावलेले आहे. त्यांच्या स्वातंत्र्याचे पंख छाटून टाळण्याचा डाव मांडूनही त्यांनी अगदी चूलमूल सांभाळणे पासून तर देश सांभाळण्यापर्यंत मजल मारली आहे.

१९९० नंतरच्या कालखंडातील कथात्मक लेखनाचा विचार करता, केवळ स्त्रियांनी लिहिलेल्या नव्हे; तर स्त्रियांनी आणि पुरूषांनी स्त्रीवादी भूमिकेतून लिहिलेल्या कथा महत्त्वपूर्ण ठरतात. भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना देऊ केलेले कायदेशीर हक्क, परदेशातील स्त्री - मुक्तीची चळवळ, या चळवळीचे या देशात विशेषतः महाराष्ट्रात उमटलेले पडसाद, दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातले बदललेले समाजजीवन, शहरीकरण, यंत्रयुग, विभक्त कुटुंबपध्दती, स्त्रियांचे उच्चशिक्षण, अर्थार्जन, व्यक्तिस्वातंत्र्यावाद, आधुनिक जीवनाबरोबरीने आलेली ऐहिक सुखे आणि मानसिक ताणतणाव, स्पर्धा, संघर्ष हे सर्व समग्र वास्तव जमेस

धरून स्त्रियांच्या कथेचा विचार करणे इष्ट ठरते. त्याचबरोबर याच वास्तवाच्या साक्षीने मराठी कथेच्या प्रांतात आरंभी कुसमावती देशपांडे, वसुंधरा पटवर्धन, विजया राजाध्यक्ष, कमल देसाई, वसुधा पाटील, आंबिका सरकार यासारख्या आणि नंतर गौरी देशपांडे, सानिया, उर्मिया पवार, आशा बगे ह्यासारख्या ज्या प्रिया तेंडुलकरांना समकालीन ठरतात अशा अनेक महत्त्वाच्या स्त्री कथाकारांनी मराठी कथेच्या बाबतीत वैविध्यपूर्ण आणि सकस, सक्षम भर घातलेली आहे याची नोंद घेणेही क्रमप्राप्त आहे.

सा□या :

सानियाने आपल्या एकूण लेखनप्रवासात व्यक्तीच्या अंत:करणाऱ्या गाभ्यातील एकाकीपणा उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. माणसे परस्परांशी जन्मसंबंधाने, प्रेमसंबंधाने जोडली जातात. पण ह्या गोतावळ्यातही ती स्वत:पुरती एकटी असतात. अशा व्यक्तींसाठी नातीगोती ही देखील एक प्रकारची बंधने ठरतात. अशा मानसिक स्थितीगतीचा आणि त्यातील भावविचारपूर्ण आंदोलनाचा शोध घेण्यात सानियाच्या प्रतिमाधार्माला विशेष रूची असलेली दिसते.

आधुनिक काळात वेगवेगळ्या कारणांनी समाजाने विभक्त कुटुंबपध्दतीचा स्वीकार व अवलंब केलेला दिसतो. सानिया यांच्या कथांमधील निवेदकही या प्रकारचा कुटुंबबंध स्वीकारते. आई-वडील, पती-पत्नी-मुले, विधवा आई व मुलगा-सून, विधुर वडील व मुलगा-सून आईवडील व मुले असा कुटुंबाचा आकृतिबंध कथांमध्ये उपयोजिलेला दिसतो. उदा. दिशा घराच्या, 'प्रतीती',

□ौरी देशपांडे :

गौरी देशपांडेच्या कथांच्या नायिका (स्त्रिया) व्यक्तिस्वातंत्र्याचा अंगीकर करणाऱ्या असल्यामुळे समाजातील आणि वाङ्मयातील स्त्रीप्रतिमांपेक्षा वेगळ्या आहेत. विवाह संस्थेची बंध-ने -न पाळ□ाऱ्या, कधी कधी तर स्त्रीचे अस्तित्त्वच झुगारून देणाऱ्या स्त्रियांचे जीवन विचित्र करणारे आहे.

स्त्री-पुरूष प्रेमाचे मोकळे किंवा नेहमीचा शब्द योजायचा तर धीट चित्रण हा गौरी देशपांडे यांच्या साहित्याला वेगळेपणा देणारा एक विशेष आहे. स्वतंत्रपणे जगणाऱ्या, बुद्धिप्रामाण्यवादी, विवेकनिष्ठ, आधुनिक, सुशिक्षित स्त्रीचे स्वप्न गौरी देशपांडे रेखाटतात. त्यांच्या नायिका संवेदनशील, अभिरूची संपन्न आणि बुध्दिमान आहेत. अशी जमेची बाजू असलीतरी गौरी देशपांडे यांच्या कथात्मक साहित्याला मर्यादित प्रतिसाद का लाभला याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला, तर □था हाती येते ? कथेच्या अगदी प्रारंभकाळापासून स्त्रीवरील अन्याय, अत्याचार, परिस्थितीने तिची केलेली कोंडी आणि मग त्याविरूध्द उठून उभी राहिलेली, संघर्ष करणारी स्त्री असे चित्र रंगवले गेले आहे. त्यात तिचा कधी विजय झाला तर कधी ती पराभूत झाली आहे. पण तिचे बंड, तिचा संघर्ष हे तिला परिस्थितीने भाग पाडलेले कृत्य आहे. गंभीर प्रकृतीच्या लेखकांनी आविष्कृत केलेला जीवनार्थ पुढे चलनी नाणे बनला

आणि आमच्या सवयीचा झाला. या सवयीला धक्का देऊन आपल्या आयुष्याचे निर्णय आपणच घेणारी 'स्वतंत्र' स्त्री गौरी देशपांड्यांनी निर्मिली, उदा. 'कारावासातून पत्रे' मधील मेरी, 'मुक्काम' मधील □ालिंदी, 'एकेक पान' गळवया मधील राधा अशा स्वतंत्र वर्तन करणारी स्त्री पात्र रेखाटली आहे.

प्रिया तेंडुलकर

प्रियाच्या कथेचा परिसर आणि वातावरण पूर्णपणे शहरी आहे. बहुतेक कथा मुंबई-पुण्यात घडतात तर काही परदेशात मध्यमवर्गीय, उच्चमध्यमवर्गीय, पांढरपेशा, सुशिक्षित उच्चशिक्षित वर्ग प्रियाच्या कथेत दिसून येतो.

मानवी जीवनाच्या नानाविध परी शोधणे, त्यांना कथारूप देणे, एकारलेपणातूनच भिन्नत्त्वाचे बारकावे टिपणे आणि वरवर साध्यासोप्या, सु□ी-समृध्द, नेटक्या वाटणाऱ्या जीवनातून व्यथा वेदना, वैफल्य, पराभूतता, एकाकीपणा यांची लपलेली रूपे शोधून शब्दबध्द करणे या सर्वांची प्रचिती प्रिया तेंडुलकरांच्या 'ल□ा', 'ज्याच्या त्याचा प्रश्न','फर्टिलिटी क्लिनिक' या कथासंग्रहामधून येतो.

स्त्री आणि स्त्री, स्त्री आणि पुरूष, नातेसंबंध, त्यातील सच्चेपणा किंवा दांभिकता, ल□ा, मातृत्त्व, सामाजिक प्रतिष्ठा, व्यक्तिगत आयुष्य, त्यातील उमेद आणि पडझड, परिस्थिती शरणता, मृत्यू यांकडे प्रिया कुतुहलाने पाहताना दिसते.

मेघना पेठे

मुंबई-पुण्यासारख्या प्रगत नागर वस्तीमधील वेगवान जीवनाचा संदर्भ मेघना पेठेच्या कथांच्या अनुभवविश्वाचा एक भाग बनलेला दिसतो. त्यांच्या कथेतील स्त्री-पुरूष पात्रे सुशिक्षित, आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असलेली तसेच वैचारिक दृष्ट्याही स्वातंत्र्याला महत्व देणारी, सामाजिक वास्तवाचे भान असणारी, सामाजिक बदलांना सामोरे जाणारी, अशी पात्रे आहेत. सर्वच पातळयावरील मानवी नातेसंबंधाच्या विविध तऱ्हा मेघनापेठे यांच्या कथेने मांडण्याचा प्रयत्न केला. उदा. 'हंस अकेला', 'आंधळयाच्या गायी' या कथासंग्रहामधून आई-मुल□ा, वडील-मुल□ी, बही□-भाऊ, मित्र-मैत्रिणी, वसतीच्या अथवा नोकरीच्या ठिकाणी बरोबर असणारे स्त्रीपुरूष, पती-पत्नी, या सर्वांमधून सामाजिक वास्तवता मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पुरूष संबंधाचे वर्णन करताना, भाषेचा धिटाईने वापर केलेला दिसतो.

आशा बगे :

'मारवा', 'पूजा', 'चंदन', 'मांडव', 'दर्प□', 'अनंत', 'निसटलेले ऋतूवेगळे', 'पाऊल-वाटेवरले गाव', या कथासंग्रहातून आशा बगे यांनी चित्रीत केलेले विश्व हे प्राध्यान्याने मध्यमवर्गीय, ब्राम्हणी कुटुंबाचे आहे. भारतीय परंपरा, मूल्य, रूढी, व्रतवैकल्ये, आचार-विचार यांचे चित्रण त्यांच्या कथांमधून आढळले. तरी त्याहीपेक्षा माणूस त्याचे मन

याविषयी त्यांना प्रचंड कुतूहल आहे. त्यामुळे एका मर्यादित परिघात या कुटूंबकथा वावरत असल्यातरी घटना-प्रसंगापेक्षा त्यातील पात्रे, त्याच्या क्रियाप्रतिक्रिया त्यांच्या मनातील आंदोलने यावर लेखिका अधिक भर देते.

आशा ब□ यांच्या □था ह्या स्त्रीवादी आहेत. त्यांच्या □थामधू-न स्त्रीजीवनाचे चित्रण येते ही स्त्री शांत, सोज्ज्वळ, सोशि□ आणि त्यागी आहे. तसेच त्यांच्या □थांतू-न प्रतिमांचा वापर वारंवार होतो, त्यातून वास्तव अथवा एखादा प्रसं□ सूचकतेने व्यक्त होतो.

संदर्भ

१.मं□ला वरखेडे (संपा.) 'स्त्रीवादी समी□ा : सं□ल्प-ा व उपयोजन', □ा.स.वा□ी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, १९९९.

२.पुष्पलता राजापुरे- तापस (संपा.), '१९८० नंतरचे स्त्री निर्मित □थ-ापर साहित्य', शब्दलय
प्र□ाश-ा, श्रीरामपूर, डिसेंबर २०१०.

३.डॉ. पंडित टापरे, '□था : रूप आणि आस्वाद', -ीहार प्र□ाश-ा, पु□े, जाने. १९९९.

४.सुमती लांडे (संपा.), 'स्त्रीवाद', शब्दलय प्र□ाश-ा, श्रीरामपूर, डिसेंबर २००७.

५.अंजली सोम□, 'मराठी □थेची स्थितीगती', प्रतिमा प्र□ाश-ा, पु□े, १९९५